# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:४३२२६८१७ ई-मेल : prog.mlwb-mh@gov.in

जावक.क्र.मका/कार्यक्रम/२०१७-१८/ 235 दिनांक:- 05/02/2018

परिपत्रक

विषय : अनुदान तत्वावर शिवन मशिन पुरविण्याबाबत.

संदर्भ : १) मका/कार्य/२०१४-१५/४८१ दिनांक १६.०४.२०१४
२) शासनाचे पत्र क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.८८/प्रशा-१ दिनंक २७.०९.२०१६
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक एएपी/लेखा/२०१६-१७/१०९२ दिनांक ०५.१०.२०१६
४) शासन निर्णय क्रमांक डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ दिनांक ०५.१२.२०१६
५) शासन निर्णय क्रमांक डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ दिनांक ३ मार्च,२०१७

मध्यवर्ती कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये अनुदान तत्वावर शिवन मशिन पुरविण्याबाबत मंडळाची योजना आहे. या योजनेअंतर्गत मंडळाच्या शिवणवर्गामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण कामगार व कामगार कुटुंबियांना शिवणयंत्राच्या १० टक्के रक्कम त्यांच्याकडुन घेऊन त्यांना मंडळामार्फत शिवणयंत्र पुरविले जाते.

शासनाच्या वरील संदर्भीय क्र.४ च्या शासन निर्णयानुसार सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात येत असुन यापुढे वस्तुरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर रोख स्वरुपात थेट लाभार्थीच्या बँक खात्यात करण्यात येणार आहे.त्यानुसार शिवण मशिनची (सिंगर) किंमत रु.५१००/- निश्चित करण्यात येत आहे.या योजनेअंतर्गत लाभार्थींना शिवण मशिनच्या किंमतीच्या ९०% रक्कम रु.४५९०/- मंजुर करण्यात येईल.

सदर योजनेच्या नियम व अटी पुढील प्रमाणे राहतील.

१. या योजनेत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनाच लाभ घेता येईल.
२. मंडळाच्या शिवणवर्ग व सरकारमान्य शिवणवर्गातील परिक्षेत वर्गात प्रथम येणे आवश्यक आहे.
३. शिवण वर्गामध्ये कामगार व कामगार कुटुंबियां व्यतिरीक्त इतरही सभासद प्रवेश घेत असल्यामुळे कामगार व कामगार कुटुंबिय सभासदांमधुनच गुणांनुक्रमे एकाची निवड करण्यात येईल.
४. लाभार्थी हा त्या आर्थीक वर्षातील केंद्राचा व शिवण वर्गाचा सभासद असावा.
५. लाभार्थ्याने विहित नमुन्यात अर्ज केंद्राच्या प्रमुखाकडे सादर करावा.
६. अर्जासोबत शिवण वर्गात प्रवेश घेतलेल्या आर्थिक वर्षातील माहे जून ची वेतन पावती / आस्थापनाचा दाखला अर्जासोबत जोडावा.
७. शिवण वर्ग उत्तिर्ण केल्याचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत सोबत जोडावी.
८. अर्जासोबत आधार कार्डची झेरॉक्स प्रत सोबत जोडावी.
९. अर्जासोबत आधार कार्डशी लिंक असलेल्या बँक खात्याची माहिती सोबत जोडावी.

१०.लाभार्थींनी परिमानाप्रमाणे वस्तुची खरेदी करुन पावती सादर करावी त्यानंतर मंजुर रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत लाभ देतांना पुढिल प्रमाणे कार्यपध्दती अंमलात आणावी.

सदर योजनेअंतर्गत केंद्र प्रमुखांनी अर्ज प्राप्त करुन घ्यावे व प्राप्त झालेल्या तारखेपासुन ७ दिवसाच्या आत सदरचे अर्ज गट कार्यालयास सादर करावे. गट प्रमुखांनी अर्जाची तपासणी करुन त्यांना प्राप्त झालेल्या तारखेपासुन ७ दिवसाच्या आत विभागीय कार्यालयांना सादर करावे. विभाग प्रमुखांनी सदर योजनांचे अर्जांची तपासणी करुन विभागीय स्तरावर मंजुरी द्यावी.अर्जांना मंजुरी दिल्याबाबत अर्जदारांना कळविण्यात यावे.तसेच वरीलप्रमाणे वस्तुची खरेदी करण्यासाठी कळविण्यात यावे. लाभार्थ्यांना खरेदी केलेल्या वस्तुची व सादर केलेल्या पावतिची शहानिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजनेअंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करावी.

प्र.कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परीक्षा अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

२) सहायक कल्याण आयुक्त,कार्यक्रम/मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

३) प्रशासन अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

४) लेखा अधिकारी/लेखा परीक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

५) प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी/विधी अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

६) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,मुंबई/ठाणे/नागपूर/कामगार क्रीडा भवन,मुंबई

६) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागीय कार्यालय, पुणे/औरंगाबाद/नाशिक/अकोला

७) सर्व सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये

८) कामगार विकास अधिकारी,नागपुर / पुणे

९) सर्व कामगार कल्याण अधिकारी सर्व गट कार्यालये ★★★

१०) सर्व केंद्र प्रमुख,सर्व कामगार कल्याण केंद्र.

★★★ यांनी सदरचे परिपत्रक सर्व केंद्रांना उपलब्ध करुन द्यावे.